# लिंग समानता

डॉ. बळीराम पवार




संस्कृती प्रकाशन

# लिंग समानता

Late.Ramesh Warpudkar College
Sopneth
Dist.Parbhani
(M.S.)

**डॉ. बळीराम पवार**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा फुले कॉलेज किनगाव,
ता. अहमदपूर, जि. लातूर (महाराष्ट्र)

**संस्कृती पब्लिकेशन, लातूर**

Late Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

**ISBN : 978-81-960127-7-9**

## • लिंग समानता

डॉ. बळीराम पवार

© संपादक 2023

• **प्रकाशक**

**संस्कृती पब्लिकेशन**
गायकवाड निवास, गणेश नगर, जुना औसा रोड,
लातूर, ता. जि. लातूर - 413512.

**मो नं - 9403163700**

• **अक्षर जुळवणी**

श्री. विकास ढमाले, श्री. अनंत कोटीवाले

• **मुखपृष्ठ**

श्री. चंद्रकांत कांबळे

• **मुद्रक**

ज्योतीचंद्र ऑफसेट प्रिंटींग अॅन्ड बायडिंग,
एल.आय.सी. कॉलनी, लातूर.

• **प्रथमावृत्ती : 1 एप्रिल 2023**

• **मुल्य 200/-**

**नोंद -** सर्व हक्क राखीव. या प्रकाशनाचा कोणताही भाग प्रकाशक आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग किंवा इतर इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिक पद्धतींसह कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे पुनरुत्पादित, वितरित किंवा प्रसारित केला जाऊ शकत नाही.

## संपादकाची भूमिका.....

महिलांचे प्रश्न आज जगभरातील असंख्य आणि बौद्धिक चर्चेचा मध्यवर्ती भाग बनले आहेत. यातील लैंगिक असमानता ही प्रमुख समस्या आहे. स्त्रिया समाजाचा अविभाज्य घटक असूनही त्या दुर्लक्षित राहतात आणि जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. स्त्री-पुरुष असमानतेचा परिणाम म्हणून समाजात त्यांच्यावर अत्याचार, अत्याचार आणि शोषण केले जाते. जेव्हा स्त्री आणि पुरुष दोघांना समान संधी मिळण्याचा हक्क असेल तेव्हाच एक राष्ट्र सामाजिक कल्याण, आर्थिक समृद्धी, निरोगी आणि शांत समाज प्राप्त करू शकते. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्री-पुरुष समानतेला महत्त्व देणे आवश्यक आहे. लैंगिक असमानतेचा परिणाम म्हणून आपल्या समाजात सामाजिक अन्याय आणि महिलांवरील हिंसाचार दिवसेंदिवस वाढत आहे. लैंगिक समानता हा मानवी हक्क आहे. संपूर्ण मानवी क्षमता आणि शाश्वत विकासासह सर्व लिंगांना समान अधिकार, जबाबदाऱ्या आणि संधी देऊन आपण या अधिकाराचे संरक्षण करणे आवश्यक आहे. सर्व लिंग, वयोगटातील आणि सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीच्या लोकांसह आपल्या समाजातील प्रत्येकजण लैंगिक असमानतेने प्रभावित आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समानता ही काळाची नितांत गरज आहे. ही निकड लक्षात घेऊन संपादकांनी स्त्री-पुरुष समानता हा विशेषांक बनवून पुस्तक प्रकाशित करण्याचा विचार केला. या ज्वलंत प्रश्नावर जागृती निर्माण करणे आणि दर्जेदार संशोधन अभ्यास करून लोकांची मानसिकता बदलणे हा 'लिंग समानता' या संपादित पुस्तकाचा उद्देश आहे. लैंगिक असमानतेमुळे महिलांना भेडसावणाऱ्या आव्हानांवर प्रकाश टाकण्याचा आणि त्या आव्हानांवर मात करण्यासाठी सूचना देण्याचाही या पुस्तकाचा उद्देश आहे.

या पुस्तकासाठी अभ्यासपूर्ण शोधनिबंधांच्या रूपाने आपले मौल्यवान संशोधन विचार आणि ज्ञान योगदान देणाऱ्या सर्व योगदानकर्त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. संशोधकांच्या संसाधनाशिवाय या पुस्तकाचे प्रकाशन शक्य झाले नसते.

**डॉ. बळीराम पवार**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा फुले कॉलेज किनगाव,
ता. अहमदपूर, जि. लातूर (महाराष्ट्र)

Late Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | ऐतिहासिक दृष्टिकोनातून महिला सबलीकरणचा एक अभ्यास<br>डॉ. शिवाजी अंभुरे | ०१ |
| २ | स्त्री भृणहत्या: कारणे व उपाय<br>डॉ. गणेश नथ्थुजी वहादे | ०८ |
| ३ | लिंगभाव असमानता आणि सामाजिक वास्तविकता<br>प्रा. डॉ. सुनिता टेंगसे | १५ |
| ४ | आदिवासी समाजातील लिंगभाव<br>प्रा. संजय जे. भगत | २३ |
| ५ | भारतातील आदिवासी महिला : लैंगिक असमानता आणि त्याचे परिणाम<br>कविता किसन भोये | २९ |
| ६ | लैंगिक समानता आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. सुरेश सखाराम भालेराव | ४५ |
| ७ | काम करण्याच्या ठिकाणी लैंगिक समानता आणि सद्यस्थिती<br>प्रा. डॉ. संबोधी एम. देशपांडे | ५२ |
| ८ | महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री दास्य विमोचन संदर्भातले योगदान<br>डॉ. अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर) | ५७ |
| ९ | महिला आणि कौटुंबिक हिंसाचार<br>डॉ. ज्योती अरविंद पोटे | ६५ |
| १० | महिला सक्षमीकरणाची वाटचाल<br>डॉ. गोरे प्रल्हाद आश्रुजी | ७८ |




## 1.

## ऐतिहासिक दृष्टिकोनातून महिला सबलीकरणचा एक अभ्यास

डॉ. शिवाजी अंभुरे
इतिहास विभाग
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी

**प्रस्तावना:-**

समाज जीवनामध्ये स्त्रियांना फार महत्त्व आहे. स्त्री जीवनाचा अभ्यास केला तर आपल्याला स्त्रीची कहाणी. तिचे जीवन तिचे जगणे हे सारे पुरुषापेक्षा वेगळे दिसून येतात. दैनंदिन जीवनात स्त्रिया अगदी सहजतेने विविध भूमिका पार पडत असतात. स्त्रीला प्रेम करण्याची कन्या .तर कधी वास्तव माता तर कधी सक्षम सहचरणी अशा विविध भूमिका अत्यंत कौशलतेने आणि प्रेमाने निभावत असतात खरच स्त्रियांच्या बाबतीत असे म्हटले जाते की स्त्रियांचा एकदा प्रथम आईच्या पोटी जन्म होतो .नंतर लग्न झाल्यावर पुनर्जन्म होतो. आणि तिने बाळाला जन्म दिल्यानंतर चा तिसऱ्यांदा पुनर्जन्म होतो. स्त्रीचे लग्न झाल्यानंतर ती आपले माणसं. आई वडील आपला परिसर आपलं लहानपण सगळं सोडून नवीन ठिकाणी संसार थाटायला जाते. परंतु त्याही ठिकाणी ती अत्यंत उत्तमरीत्या सहजपणे संसार आनंदाने करत असते .परंतु आपल्या दुर्दैवाने प्राचीन काला मध्ये. मध्ये युगात काळा मध्ये. आधुनिक काळात स्त्रियांना वेगवेगळ्या कारणामुळे दुय्यम स्थान दिले आहे .स्त्रियांच्या बाबतीत अनेक वाईट रूढी. परंपरा निर्माण झाल्या. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार दिला नसून तिच्यावर केशवपण. पुनर्विवाह बंदी. देवदासी.प्रथा .सती प्रथा. जरठ विवाह. अशा अनेक वाईट परंपरा लादण्यात आल्या होत्या. अशा परिस्थितीतून स्त्रियांना बाहेर काढून काही समाज सुधारकाने स्त्रिया सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. आणि स्त्रियांच्या मूलभूत अधिकार व हक्काबाबत शासनात व जनतेत जाणीव निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला आहे

५. समीता महत्र, भारतीय स्त्री आणि मानवाधीकार, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती,जूलै २०११.
६. गजानन देवकर, स्त्रीभृणहत्या : चिंता आणि चिंतन, संपादित ग्रंथ, अलंकार प्रकाशन उमरी २०१४.
७. राजाराम अंकुश झोडगे, स्त्री–भृणहत्या, कारणे व उपाय, सप्टेंबर २०१२



Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

# 3.
# लिंगभाव असमानता आणि सामाजिक वास्तविकता

**प्रा. डॉ. सुनिता टेंगसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपुकर महाविद्यालय,
सोनपेठ, जिल्हा-परभणी.

व्यक्ती, कुटुंबआणी समाजाचे अस्तित्व स्त्री-पुरुषांच्या परस्पर सहकार्य, उत्कट प्रेम, सद्भावना, त्याग यासारख्या बाबीवर अवलंबून असते. स्त्री शिवाय पुरुष आणि समाज असणे अशक्य आहे.समाजाचे अस्तित्व स्त्रीच्या उत्कट त्यागावर आधारलेले आहे, तथापि स्त्रीला स्त्री म्हणून प्रतिष्ठेने जगता आलेले नाही ही वास्तविकता आहे. एक स्त्री म्हणून तिचा सन्मान होणे आवश्यक आहे. आजही एकविसाव्या शतकात एक स्त्री म्हणून, मुलगी म्हणून तिची अवहेलना होत असल्याचे नेहमीच अनुभवास येते. आजही आधुनिक, शिक्षित कुटुंबात मुलगा आणि मुलगी हा भेद कळत- नकळत केला जातो. मुलाला झुकते माप आजही दिले जाते. महिलांचे कार्यक्षेत्र आज विस्तारित झाले असले तरीही तिने प्रथमतः कुटुंब सांभाळले पाहिजे ही बहुतांश कुटुंबीयांची मानसिकता आजही कायम आहे. महिलेने कुटुंबाला प्राधान्य देऊन इतर जबाबदाऱ्यांही चोखपणे पूर्ण कराव्यात ही अपेक्षा व्यक्त केली जाते. एकविसाव्या शतकातही भारतीय स्त्रियांना अनेक समस्यांनी जेरबंद केले आहे. त्यातल्या त्यात बालविवाह, पुनर्विवाह, हुंडा पद्धती, स्त्री-पुरुष असमानता, कौटुंबिक हिंसाचार, बलात्कार, असुरक्षितता, रक्तक्षय, अवहेलना यासारख्या विविध समस्यांमध्ये आजची स्त्री ही गुरफटून गेलेली आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

१. भारतीय समाजातील स्त्रियांचा दर्जा अभ्यासणे.
२. स्त्री पुरुष समानतेचे स्वरूप स्पष्ट करणे.
३. लिंगा संदर्भातील जीवशास्त्रीय आणि सामाजिक संकल्पना स्पष्ट करणे.
४. लिंगाधीष्टीत भूमिकांची निर्मिती अभ्यासणे.
५. भारतीय स्त्रियांचा बदलत्या दर्जाची मांडणी करणे.
६. लिंगाधीष्टीत असमानतेच्या समस्येवर उपाय सुचवणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, इंटरनेट वरील माहिती या दुय्यम तथ्य सामग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

गृहीत कृत्य

भारतीय समाजात स्त्रियांचे कार्यक्षेत्र विस्तारित झाले असले तरी आजही लिंगाधीष्टीत असमानता प्रकर्षाने जाणवते.

लिंगाधीष्टित असमानतेची समस्या फक्त भारतीय समाजात आहे आणि अन्य समाजामध्ये नाही असा समज करून घेणे चुकीचे आहे. अमेरिकन समाजाचे अध्ययन करणाऱ्या अभ्यासक नमूद करतात कि तेथे अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी स्त्री उमेदवार असल्यास असंख्य पुरुष मतदार मतदान करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होणार नाहीत, दीडशे वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडामध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी एकाही स्त्रीला राजकीय पक्षांनी उमेदवार म्हणून पाठिंबा दिलेला नाही.ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास अभ्यासकांच्या निष्कर्षातील वास्तव स्पष्ट होते. पुरुष डॉक्टरांच्या तुलनेत महिला डॉक्टरांची संख्या रशियामध्ये अधिक आहे, असे असूनही अमेरिका अथवा अन्य प्रगत देशांमध्ये पुरुष डॉक्टरांना ऐवढा मान सन्मान व प्रतिष्ठा रशियातील महिला डॉक्टरांना मिळत नाही असे जेरॉस एक्षेमन यांनी आपल्या ग्रंथात नमूद केले आहे. म्हणून लिंगाधीष्टीत असं मानतेची समस्या ही समाज संरचनेतून निर्माण झालेली समस्या आहे असे म्हणता येईल.

भारतीय इतिहासाच्या कुठल्याही वळणावर नजर टाकली तर आपल्याला सामर्थ्यवान धैर्यशील व बुद्धिमान स्त्रियांची उदाहरणे स्पष्ट दिसतात. उदाहरणार्थ वैदिक काळात द्रौपदी, सीता, गार्गी, मैत्रिय प्रसिद्ध गणिततज्ञ लीलावती मध्ययुगीन बंडखोर संत मीरा, जनाबाई, महादंबा, झुंजार लढवय्या व कुशल राज्यकर्ते अहिल्याबाई होळकर, झाशीवाली लक्ष्मीबाई, सुलताना रझिया,राणी दुर्गावती इत्यादी. हे सर्व मान्य केले तरीही कर्तृत्ववान स्त्रियांची ही अपवादात्मक उदाहरणे होय, असेही म्हणावे लागेल. कारण भारतीय समाजातील बहुतांश स्त्रियांना शिक्षण घेण्याची संधी नाकारण्यात आली होती. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार नाकारण्यात आला होता. विधुरांच्या पुनर्विवाहास मात्र समाजाची मान्यता होती. ही उदाहरणे भारतीय समाजातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरची संधी नाकारण्यात आली होती हेच दर्शवितात,म्हणून लिंगादिष्ट समानता हा प्राचीन व मध्ययुगीन काळाचा वारसा होय असे म्हणता येईल.



लिंग: जीवशास्त्रीय व सामाजिक संकल्पनेमधील फरक:

लिंग या संज्ञेचा अर्थ समजून घेताना इंग्रजी भाषेत लिंग या शब्दासाठी सेक्स व जेंडर हे दोन पर्यायी शब्द आहेत. Sex हा शब्द जीवशास्त्रीय दृष्ट्या वापरला जातो तर Gender हा शब्द सामाजिकरणाच्या संदर्भात वापरला जातो. उदा. स्त्रियांच्या जातीत जन्माला आल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे लिंग स्त्रीलिंग आहे असे आपण म्हणतो. लिंग हा गुणविशेष निसर्गदत्त आहे, असा लिंग या संज्ञेचा जीवशास्त्रीय अर्थ आहे.ती व्यक्ती जन्मापासून वाढ होताना सामाजिक करण्याच्या प्रक्रियेत समाजाला अपेक्षित असणारे बाईपणाचे गुण आत्मसात करते उदाहरणार्थ मुलाने मुळूमुळू रडू नये हे त्याला शिकवले जाते. लज्जाशीलतेचा गुण मुलींमध्ये विकसित केला जातो. चालताना पावलांचा फारसा आवाज येणार नाही हि बाब मुलींनी आत्मसात करावी अशी समाजाची अपेक्षा असते. पावलांच्या आवाजाने घरातील लक्ष्मी निघून जाते असे मुलीच्या मनावर बिंबवले जाते. अशा प्रकारे सामाजिकरनाच्या प्रक्रियेमध्ये लहान मुलांच्या वर्तन प्रक्रियांना पुरुषीपणा आणि बायकीपणाच्या रूढ साचात बसविण्याचा प्रयत्न केला जातो. मुलींना दुबळ्या, सहनशील होण्यास शिकवले जाते. मुलांना आक्रमक व अधिकार गाजवणारा होण्यासाठी उत्तेजित केले जाते. पुरुषीपणा व बाईपणा ठरविण्याचे निकष सर्वच समाजामध्ये काळाच्या ओघात उत्क्रांत झाले. यां नीकशाच्या आधारे व्यक्तीच्या वर्तन क्रिया तपासून पाहिल्या जातात व तपासण्याचे निष्कर्ष सांगण्यासाठी पुरुष आणि स्त्रि या संज्ञांचा उपयोग केला जातो. यावरून पुरुष व स्त्री या संकल्पनांमध्ये सामाजिक आशय अंतर्भूत आहे हे स्पष्ट होते. हा आशय स्पष्ट करण्यासाठीच इंग्रजी भाषेमध्ये जेंडर या अर्थाने लिंग या शब्दाचा उपयोग आपण करत असतो.

**लिंगाधीष्टीत भूमिका निर्मितीचा सुरुवातीचा कालखंड:**

समाज विकासाच्या पशुपालन अवस्थेनंतरची अवस्था म्हणजे कृषक समाज होय.या अवस्थेत प्रारंभीच्या काळात एकूण लोकसंख्या ही कमी होती. समाज आकाराने लहान होता. समाजाचे सर्व घटक एकत्रित काम करत असत,तसेच अन्न क्रियेमध्येही एकत्रित रित्या सहभागी होत असत. या समाज व्यवस्थेत लिंग या घटकावर आधारित श्रम विभाजन अतिशय अल्प असे होते, लिंगाधीष्टीत भूमिका निर्धारित होण्याचा हा प्रारंभीचा काळ होता.लोकसंख्या वृद्धी आणि उत्क्रांत होणारी सभ्यता यामुळे समाजव्यवस्था अधिकाधिक गुंतागुंतीची होत गेली. भूमिकांच्या आधारे समाज घटकांचे दुहेरीकरण होऊ लागले. वृद्धांना श्रमशक्तीच्या मुख्य प्रवाहात वगळण्यात आले. स्त्रियांवर ग्रहकार्याची व मुलांच्या संगोपनाची जबाबदारी

[stamp obscured] कामातून उत्पन्न मिळवणे आणि स्त्रियांवर गृहिणी म्हणून घराची जबाबदारी सांभाळणे सोपवले गेले. समाज व्यवस्थेत स्त्री पुरुषांच्या लिंगादिष्ट भूमिकांचा हा आकृतीबंध निश्चित झाला. आधुनिक शिक्षणाच्या प्रसारानंतरच फारच अल्पसंखेत स्त्रिया उत्पादक क्षमता प्रवाहात सहभागी झाल्या.

**स्त्री-पुरुष असमानतेतील विचारधारा:**

लिंग हा गुणविशेष निसर्गदत्त आहे म्हणून जैवकीय दृष्टीने स्त्री पुरुष समान आहेत असे म्हटले जाते. असे असूनही स्त्रियांबाबत भेदभाव का केले जातात किंवा संधी एक हक्क आदींबाबत स्त्री पुरुष विषमतेची स्थिती का निर्माण झाली? हा प्रश्न उपस्थित होतो. यासाठी विचारधारा व सामाजिक संरचना ही दोन ठळक कारणे जबाबदार असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

**विचारधारा:**

भारतीय समाजात स्त्रिया पवित्र व दैवी वा ईश्वरी आहेत अशी धरणा प्राचीन काळापासूनच आहे. स्त्रियांच्या नावासमोर देवी हा शब्द जोडण्याचा प्रभात आजच्या काळातही सुरू आहे. या धारणेच्या पूर्णतः विरोध असणारी धारणा देखील भारतीय समाजात फक्त रुजली आहे ती म्हणजे रजस्वला (मासिक धर्म) या कारणामुळे स्त्रिया या अशुद्ध वा प्रदूषित असतात. स्त्रियांच्या स्थितीबाबतच्या अशा धारना अत्यंत प्रभावी असल्याचे सर्वच समाजात दिसून येते. अशा धरणा विचारधारेच्या मुळाशी असतात वर्ण व जातीच्या श्रेष्ठ कनिष्ठ व्यवस्थेत पुरुषां प्रमाणेच स्त्रिया देखील समाविष्ट आहेत. कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या जातीमधील स्त्रिया चरित्रहीन असतात असे श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या जातीमधील काही स्त्रिया मानतात तर या उलट श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या जातीमध्ये स्त्रियांबाबत कनिष्ठ जातीमधिल स्त्रियांचे अनेक पूर्वग्रह असल्याचे दिसून येतात.

**सामाजिक संरचना:**

संरचनात्मक दृष्टीने पितृसत्ताक व्यवस्था हे स्त्री पुरुष असमानता निर्माण होण्याचे एक प्रमुख कारण आहे. मुलगी ही परक्याचे धन आहे एक ना एक दिवस तिला तिच्या पतीच्या घरी जायचे आहे हा विचार पितृसत्ताक व्यवस्थेची देणगी होय असे म्हटले जाते. बालवयात आई-वडील, तरुण वयात पती आणि वृद्धावस्थेत पुत्र स्त्रिचे संरक्षण व देखभाल करण्याचे कार्य करतो अशा विचाराची निर्मिती पुत्र सत्ताक व्यवस्थेतून झाली. पुरुषांचे उच्च स्थान आणि पुरुषांपेक्षा स्त्रियांची दुय्यम भूमिका अशा विचारांची निर्मिती पितृसत्ताक व्यवस्थेतून झाली व त्यास समाज मान्यता प्राप्त झाली. पुरुषांच्या वर्चस्वाचे हे तत्व व केवळ कुटुंबापुरते मर्यादित न राहता घराच्या उंबरठा ओलांडून घराबाहेर जगातही शिरका करते. म्हणून आर्थिक



सामाजिक अशा सर्व क्षेत्रात सत्तास्थाने पुरुषांच्या हातात एकवटली असल्याचे सर्वत्र आढळून येते.

स्त्रियांचे मूल्य त्यांच्या पुनरुत्पादन क्षमते बरोबर पुरुषांशी असणाऱ्या नात्यावरून ठरवले जाते. उदा. व्यापारी कंपनीचे प्रेसिडेंट आणि व्हाईस प्रेसिडेंट यांच्या पत्नीचे मूल्य त्यांच्या वैयक्तिक गुणवत्तेच्या आधारावर ठरविले जात नाही व्हाईस प्रेसिडेंट ची पत्नी शिक्षण व बुद्धिमत्ता, संवाद, कौशल्य आदी बाबतीत प्रेसिडेंट च्या पत्नी पेक्षा वरचढ असली तरीही तिच्यापेक्षा प्रेसिडेंट च्या पत्नीला अधिक मानसन्मान व प्रतिष्ठा लाभत असते. विधवा स्त्रीला व मुलाबाळे नसणाऱ्या स्त्रियांना अशुभ मानले जाणाऱ्या परंपरेचे पालन करणारे काही लोक आजही आपल्याला आढळून येतात.

**भारतीय स्त्रियांचा बदलता दर्जा**

स्त्रि व पुरुषांच्या दर्जाबाबत असमानतेचे स्थिती हे सर्व समाज व्यवस्थेत दिसून येणारे एक वास्तव आहे, असे असले तरीही स्त्रियांच्या दर्जात विविध प्रकारे बदल देखील घडून येत आहेत हे लक्षात घेणे आवश्यक आहे.भारतीय समाजात केवळ लिंग या एकाच आधारावर सर्व स्त्रियांची स्थिती समान नाही. श्रीमंत व उच्च वर्गातील स्त्रियांची स्थिती मध्यम वर्गातील स्त्रियांपेक्षा भिन्न आहे, तसेच कनिष्ठ वर्गातील स्त्रियांची स्थिती मध्यम व उच्च वर्गातील स्त्रियांपेक्षा भिन्न आहे. लिंग समान असूनही स्त्रियांच्या स्थितीबाबतची ही भिन्नता सामाजिक विजातीयतेतुनच निर्माण होते. म्हणून लिंगाधीष्टीत असमानतेची स्थिती सर्व स्त्रियांबाबत एकसारखी आहे असे म्हणता येत नाही.

स्त्रियांच्या दर्जाचा किंवा त्यांच्या स्थानाचा ऐतिहासिक दृष्टीने आढावा घेतला तर स्त्रियांच्या बदलत्या दर्जाचे स्वरूप स्पष्ट होते. उदा.प्राचीन काळातील भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणधिकार, धार्मिक उपासनेबाबत पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार होते.मध्ययुगीन व्यवस्था आणि परकीय आक्रमणाचे शासन यामुळे समाजातील सर्व धर्मातील स्त्रियांची स्थिती गुलामा सारखी झाली. म्हणजे त्यांच्या वर विविध प्रकारचे बंधने लाजण्यात आली. शिक्षणाचा प्रसार, समाज सुधारकांचे प्रयत्न या कारणामुळे स्त्रियांच्या हक्कांवर भारतीय जनमानसात जाणीव जागृती निर्माण होण्यास स्वातंत्र्यपूर्व काळात प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने स्त्री पुरुष समानतेच्या तत्त्वाची हामी मूलभूत अधिकारात द्वारे दिली.भारतीय स्त्रियांना समान सामाजिक दर्जा संविधानाने मिळवून दिला आहे.

स्त्रियांची परिस्थिती सुधारणा व्हावी, त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे या उद्देशाने भारतीय शासनाने विविध प्रकारची कायदे केले.उदा. बालविवाह बंदी कायदा, हिंदू विवाह व घटस्फोट कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, आना विधवा स्त्रीला पुनर्विवाह करण्याचा हक्क मिळाला आहे तसेच विवाहित स्त्रीला माहेरच्या घरी वडिलोपार्जित इस्टेटमध्ये, तसेच पतीने मिळवलेल्या संपत्ती मध्ये संपादित वाटा मिळाला आहे. विवाह संबंधित आणि कुटुंबातील स्थान या दोन बाबतीत स्त्रियांचा दर्जा आता पूर्वीपेक्षा अधिक उंचावला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी सुरू केलेली स्त्री पुरुष शैक्षणिक समता निर्माण होणे होण्याची वाट मुखर झाली आहे. विशेषतः उच्च व मध्यमवर्गातील स्त्रियांचे आर्थिक परावलंबित्व झपाट्याने कमी होऊ लागले आहे.नोकरी व्यवसाय उद्योग आणि सर्वच क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या एकूण संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. आरक्षणाच्या तरतुदीमुळे पंचायत राज्यस्तरावर महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे. घटक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील राजकारणात महिलांचा राजकीय सहभाग वाढल्यामुळे आरक्षणाची तरतूद करण्याबाबत सहमती होत आहे. थोडक्यात स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात भारतीय स्त्रियांचा दर्जा बदलला आहे. किंबहुना पूर्वीपेक्षा अधिक उंचावला आहे.

**लिंगाधीष्टित असमानतेच्या समस्येवरील उपाय योजना**

भारतीय समाजात स्त्री पुरुष समानतेच्या विचार केवळ पाश्चिमात्यांच्या अनुकरणातून आलेली नाही हे सर्वप्रथम लक्षात घेणे आवश्यक आहे. लिंगादिष्टीत असामानत हे वास्तव आहे. पाश्चात्य समाजातील स्त्रीमुक्तीवादाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या विचारसरणी म्हणून त्यांची हेटाळणी करणे योग्य नाही. स्त्री पुरुष समानतेच्या कल्पनेला वैचारिक वातात्विक बैठक आहे. लिंगाधीष्टीत असमानतेच्या समाजशास्त्रीय विचारातून स्त्री पुरुष समानतेच्या कल्पनेचे व यामागील तात्विक बैठकीचे आकलन होऊ शकते.

**लिंगाधीष्टीत असमानतेच्या समस्येवरील उपाययोजना**

स्त्रियांच्या समस्या या भावनिक आणि मानसिक नाही.स्त्रियांच्या समस्या लिंग या निसर्गदत्त गुणविशेषातून निर्माण झालेल्या नाहीत,तसेच त्या व्यवस्थापनाच्या देखील नाही ते लक्षात घेणे आवश्यक आहे.लिंगभाव विषय जनजागृती सर्व स्तरावर घडवून आणणे ही या समस्येवर महत्वपूर्ण उपाययोजना आहे.लिंग हा गुणविशेषण निसर्गदत्त असला तरीही त्याच्याशी संबंधित जीवनशैली, सामाजिक स्थान व भूमिका हे सामाजिक रचित आहेत. म्हणून स्त्रीकडे बघण्याच्या विषमता मुलक दृष्टिकोनत बदल होणे आवश्यक



आहे .सरकारची जबाबदारी ही केवळ स्त्रीची नाही हे समजविण्यासाठी स्त्री-पुरुषांमध्ये जाणीव जागृतीचे कार्यक्रम घेणे.सदनिका भूखंड पती-पत्नीच्या संयुक्त नावे करणे. साधन स्रोतांची मालकी व वापरण्याचे अधिकार स्त्रियांना मिळणे, यासारख्या मुलगामी संरचनात्मक बदल हे या समस्येवरील महत्वपूर्ण उपाययोजना आहेत.

**सारांश**

भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा हक्क देऊन स्त्री-पुरुष भेदभावाचे उच्चाटन केले आहे.संविधानात समानतेचा अधिकार समाविष्ट असल्यामुळे मानवी जीवनाच्या विभिन्न क्षेत्रातील स्त्री-पुरुष भेदभावाची तीव्रता कमी होण्यास प्रारंभ झाला आहे असे निश्चित म्हणता येईल. स्त्रियांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारद्वारे विविध प्रकारचे कायदे केले जात केले आहेत. हुंडा प्रतिबंधक कायदा, लैंगिक शोषण अत्याचार विरोधी कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, वडिलोपार्जित मार्फत मालमत्ते स्त्रियांचा वारसा हक्क, समान काम समान वेतन यासारखे विविध हक्क आणि संधी प्राप्त करून देणारे कायदे करण्यात आलेले आहेत. स्त्रियांचे रक्षण करण्यासाठी राष्ट्रीय घटक, राज्य स्तरावर महिला आयोग शासनाने निर्माण केला आहे. स्त्रियांच्या सबलीकरणासाठी शासनाद्वारे वेगवेगळे धोरणात्मक निर्णयही घेतले जात आहेत. जसे की शिक्षणाच्या विविध स्तरावर स्त्रियांसाठी मुलींसाठी आरक्षित जागा ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, स्थानिक स्वराज्य संस्था शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण, संघटित क्षेत्रातील रोजगारांमध्ये महिला आरक्षण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, थोडक्यात महिला कल्याण कार्यक्रमाचे अंमलबजावणी करून महिलांच्या समस्यांची निराकरण करण्याच्या प्रयत्नांना स्वातंत्र्योत्तर काळात गती प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. महिलांसाठीच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्था हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. आपल्या हक्काच्या रक्षणासाठी महिलांमध्ये अधिक वाढत्या प्रमाणावर जाणीव जागृती निर्माण होणे ही स्त्रियांच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना होय असे म्हणता येईल.

**संदर्भ**


१. लोटे रा.ज.भारतीय सामाजिक संरचना आणि समस्या, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर 2007,पान.नं.१५७ ते १६१

२ डॉ.काचोळे दा.धो, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००५,पान.न.६३.

३. डॉ. मनोहर डी एस, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, अरुणा प्रकाशन, लातूर,२००३,पान नं १३ ते १५
४. डॉ निताळे,डॉ भटकर डॉ सोरंडे, माध्यम आणि सामाजिक बदल, अथर्व पब्लिकेशन्स, पुणे,२०१७,पान नं.९०,९१
५. https://maharashtratimes.com/editorial/ravivar-ata/womens-equality-day/articleshow/65545039.cms
६. https://divyamarathi.bhaskar.com/news/praveen-ghodeswar-writes-about-gender-equality-should-be-established-1561372399.html
७. ttps://mr.m.wikipedia.org/wiki/%E0%A4%B2%E0%A4%BF%E0%A4%82%E0%A4%97%E0%A4%AD%E0%A4%BE%E0%A4%B5

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



# 4.
# आदिवासी समाजातील लिंगभाव

प्रा. संजय जे. भगत
विभाग प्रमुख, समाजशास्त्र
महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, अमरावती

## प्रस्तावना

भारतातील स्त्रीयांचे सामाजिक स्थान अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतिक बाबीवर अवलंबून असते. समाज शेती प्रधान आहे की उद्योग प्रधान, कुटुंबव्यवस्था मोठी आहे की लहान, यावर समाज घटकांना राजकीय स्वातंत्र आहे की नाही यावर स्त्रीचे हक्क तिला मिळणाऱ्या सवलती आणि तिच्याकडून अपेक्षित असणाऱ्या जबाबदाऱ्या यावर अवलंबून असतात. स्त्रीचा दर्जा जसा व्यवस्थाशी व परिस्थिती निगडीत असतो तसाच तो समाजमान्य निती मूल्यावर ही अवलंबून असतो. तिला शिक्षण देऊन अर्थाजन करून द्यावे की, अबला आहे म्हणून तिला घरच्या चार भिंतीमध्ये सुरक्षीत ठेवण्याचा खटाटोप करावा हा परिणामतः त्या त्या समाजाचा प्रश्न होऊन बसतो.

आजपर्यंतच्या इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्याला विविध प्रकारचे समाज दिसतात. हे समाज त्यांच्या नितीमूल्यावर आणि त्यांनी स्विकरलेल्या व्यवस्थापनावर उभे राहीले. काही समाजात गरजेनुसार व्यवस्था बदलाव्या लागल्या काहीमध्ये नितीमूल्य बदलली आणि त्याबरोबर समाजातील स्त्रीयांना कधी शिकायला मिळाले तर कधी घरात बसून राहावे लागले. कधी मनाप्रमाणे मनाचा जोडीदार निवडता आला तर कधी पती हाच देव मानून कळते न कळते तोपर्यंत सासरी जावे लागलं.

आजची स्त्री जीवनाच्या विविध क्षेत्रात मुक्त संचार करीत आहे. पुरूष जी जी कामे करतो ती सर्व कामे स्त्री करतांना दिसते. ती मोठ्या कंपन्यामधून, कारखान्यामधून, अधिकारी म्हणून काम करते. कंपन्यांच्या कामासाठी प्रदेश भ्रमण करणे, ती स्त्री असून सुध्दा मोकळेपणाने कामे करते. त्यांना दबावही ठेऊ शकते. या सर्वदृष्टीने विचार केला तर असे म्हणता